माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : १२६/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. दुर्योधन दौलत शहारे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, तथा सचिव,**
**ग्रामपंचायत, कोदामेडी, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जुनी,**
**जि. गोंदिया-४४१८०७**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि),**
**पंचायत समिती, सडक/अर्जुनी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १०.०१.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०४.२०२२ | --- | २२.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ८५८/२०२० मध्ये दिनांक २८.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १०.०१.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, कोदामेडी, पो. बाम्हणी, ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया श्री. आर. एम. बोरकर उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि) , पंचायत समिती, सडक/अर्जुनी ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया यांच्या तर्फे श्री. पी. एफ. बन्सोड, सहायक प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. ८५८/२०२० मध्ये दिनांक २८.०४.२०२२ रोजी सुनावणी घेवून " सदर प्रकरणी अपिलार्थीस अद्यापही कोणतीही माहिती पुरविण्यात न आल्यामुळे कलम ७ (१) चा भंग होत असून जनमाहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त ) इतकी शास्ती लादण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा रक्कम, १८- माहितीचा अधिकार ००७०-०१६१ या लेखाशिर्षाखाली जमा करावी व त्याचा अनुपालन अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर करावा. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत अपिलार्थी श्री. शहारे यांच्या जोडपत्र-अ अन्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी," या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २०.०६.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तक्रारकर्ता, श्री. शहारे यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जात, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली असून माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर लादलेल्या शास्तीची रक्कम कलम ७ (१) नुसार अधिकतम शास्ती करण्यात यावी, तसेच त्यांना झालेल्या मानसिक शारीरिक व आर्थिक त्रासापोटी नुकसान भरपाई प्रदान करून कठोर कारवाई कररण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्यानुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी दि. १०.०१.२०२४ रोजी सादर केलेल्या पत्रानुसार तक्रारकर्ता यांना दि. ०९.०१.२०२४ रोजी नोंदणीकृत टपालाने माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी उपकोषागार कार्यालयात रु. ५०००/- इतकी शास्तीची रक्कम दि. ०९.०३.२०२३ रोजी भरली आहे. आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले असल्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग
सत्यमेव जयते
★नागपूर★

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** १०.०१.२०२४

जा.क्र. 2101 दि. 4 APR 2024